क्र.राजस्व/सीआर-45/ब-1/कावि-508/2015.
जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कार्यालय.
नागपूर दिनांक 04 / 08 /2015.

1,2,3

विषय :- जमीन - नागपूर जिल्हा.
नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पास प्रकल्प राबविण्याकरिता शासकिय जमिनीचा आगाऊ ताबा देण्याबाबत.

संदर्भ :- 1) शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई निर्णय क्रमांक जमीन-2015/प्र.क्र.45/ज-1, दिनांक 01 जुन, 2015.
2) शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई निर्णय क्रमांक टिपीएस-2414/153/प्र.क्र.189/2014/नवि-9, दिनांक 12 जुन, 2015.
3) व्यवस्थापकीय संचालक, नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि., नागपूर यांचे पत्र क्र.एन.एम.आर.सी./जमीन/250/2015, दिनांक 27/07/2015.

## आदेश

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय दिनांक 30/01/2014 रोजी राज्य शासनाने व दिनांक 21/08/2014 ला केंद्र शासनाने नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पास मंजुरी प्रदान केलेली आहे. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या रनिंग सेक्शन, स्टेशन व पार्कीगकरिता शासकिय जमिनीची मागणी व्यवस्थापकीय संचालक, नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि., नागपूर यांनी केलेली असून शासकिय जमिनीचा आगाऊ ताबा मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

शासन, नगर विकास विभाग, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई निर्णय क्रमांक टिपीएस-2414/153/प्र.क्र.189/2014/नवि-9, दिनांक 12 जुन, 2015 मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 च्या कलम 20(4) अन्वये अधिसूचनेनूसार व शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई निर्णय क्रमांक जमीन-2015/प्र.क्र.45/ज-1, दिनांक 01 जुन, 2015 नुसार प्रदान केलेल्या अधिकारांनुसार खालील तक्यात दर्शविलेल्या शासकिय जमिनी वेळीच उपलब्ध न करुन दिल्यास कालापव्यय होऊन सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीस विलंब होऊ शकतो, असे मला वाटते त्यामुळे मी, जिल्हाधिकारी, नागपूर खालील शासकिय जमिनी अटी व शर्तीचे अधिन राहून तसेच शासनाच्या अंतिम आदेशाच्या अधिन राहून आगावू ताबा देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मौजा व तहसिल | स.क्र./न.भू.क्र. | सध्याचे मालमत्ता धारक | एकूण क्षेत्र | मागणी केलेले क्षेत्र | मुल्यांकन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मौजा निलडोह, ता. हिंगणा | स.क्र.18 | समादेशक, राज्य राखीव पोलीस दल क्रमांक 4, हिंगणा | 26.07 हे.आर | 26.07 हे.आर | रु.63,81,00,000/- |
| 2 | मौजा सिताबर्डी, ता. नागपूर (शहर) | स.क्र.302, न.भू.क्र.1848 | संचालक, वसंतराव नाईक शासकिय कला व समाज | 5.35 हे.आर | 2535.77 चौ.मी. | रु.17,19,25,206/- |

- 2 -

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विज्ञान संस्था, नागपूर | | | रु.95,07,37,220/- |
| 3 | मौजा धंतोली ता. नागपूर (शहर) | स.क्र.98,99, 100,101, न.भू.क्र.9 | वरीलप्रमाणे | 6.50 हे.आर | 19889.90 चौ.मी. | |
| | | | एकुण | | | रु.1,76,07,62,426/- |

अटी व शर्ती :-

1) प्रश्नाधिन जमीन सद्यस्थितीत संबंधित विभागाच्या ताब्यात आहे. परंतू संबंधित विभागाच्या वापरासाठी पर्यायी व्यवस्था झाल्याने त्यांनी दिनांक 03/08/2015 रोजी झालेल्या सभेत आगाऊ ताबा देण्यास संमती दिलेली आहे.

2) जमिनीचा आगाऊ ताबा दिल्याच्या दिनांकापासून त्या जमिनीचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी व्यवस्थापकीय संचालक, नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि., नागपूर यांची राहील व जमिनीचा वापर विहीत प्रयोजनासाठी करावयाचा नसल्यास सदर जमीन शासनाकडे परत करण्याची जबाबदारी त्या विभागाची राहील.

3) सदरची जमीन शासनाने ठरवून दिलेल्या अटी व शर्तीवर धारण करावी लागेल.

4) सदरची जमीन शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणालाही हस्तांतरीत करता येणार नाही.

5) ज्या प्रयोजनाकरिता जमिनीचा आगाऊ ताबा मंजूर केला आहे, त्याच प्रयोजनाकरिता जमिनीचा वापर करावा लागेल. शर्तभंग केल्यास जमिनीवर बसविण्यात आलेल्या संयत्र व सामुग्री, बांधकाम यासह शासनास परत घेण्याचा अधिकार राहिल.

6) अट क्रमांक 5 अन्वये शासनास ती जमीन कोणत्याही वेळी परत घेण्याचा अधिकार राहील. तेव्हा ती जमीन कोणत्याही प्रकारची अडथळा निर्माण न करता शासनास परत करावी लागेल.

7) प्रश्नाधिन जमीन ज्या प्रयोजनासाठी देण्यात आलेली आहे व जो पावेतो त्या जमिनीचा वापर सुरु राहिल तो पावेतो व्यवस्थापकीय संचालक, नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि., नागपूर यांच्या ताब्यात व व्यवस्थापनेत राहिल व सदर विभाग प्रश्नाधिन जमीन इतर कोणत्याही प्रकारे अभिहस्तांकित/विक्री/भाडयाने दुसऱ्या व्यक्तीस/संस्थेस वा तत्सम त्रयस्थ व्यक्तीस शासनाचे मान्यतेशिवाय देता येणार नाही.

8) प्रश्नाधिन जमिनीचा डेपो, रनिंग सेक्शन, स्टेशन व पार्कींगकरिता उपयोग संपुष्टात आल्यास सदरचे क्षेत्र तात्काळ महसूल व वन विभागाकडे कोणत्याही अटी/शर्ती शिवाय विनामुल्य परत करील व सदर जमिनीचे विल्हेवाट लावण्याचा अधिकार महसूल विभागास राहील.

9) नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि. ही कंपनी भारत सरकारच्या कार्पोरेट अफेअर्स मंत्रालय अंतर्गत रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, मुंबई येथे दिनांक 18 फेब्रुवारी 2015 रोजी नोंदणी करण्यात आलेली आहे. सदर कंपनीचा सर्टिफिकेट ऑफ इनकार्पोरेशन (सी.आर.एन.) U60100MH2015SGC262054 आहे. सदर कंपनीमध्ये शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र.नासुप्र-3313/प्र.क्र.41/नवि-7, दिनांक 30 जानेवारी, 2014 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार सदर मेट्रो प्रकल्पातील निधी उभारणी ढाच्यातील राज्य शासनाचा 20% सहभाग हिस्सामध्ये शासकिय जमिनीच्या प्रचलित मुल्य रुपये 1,76,07,62,426/- (रुपये एकशे छयाहत्तर कोटी सात लक्ष ब्यासष्ट हजार चारशे सव्वीस फक्त) चे पुस्तकी समायोजन करण्यात यावे.

10) सदर मंजूर जमिनीवर बांधकाम करताना प्रादेशिक मंजूर विकास आराखडयातील तरतूदीप्रमाणे बांधकाम अनुज्ञेय राहील.

11) जमीन हस्तांतरीत तारखेपासून तीन वर्षांचे आंत सदर क्षेत्रावर बांधकाम करणे, बंधनकारक राहील.

12) जागेचे सिमांकन भूमी अभिलेख विभागामार्फत करुन घेणे, बंधनकारक राहील.

13) उपविभागीय अधिकारी, नागपूर (शहर) व उपविभागीय अधिकारी, नागपूर (ग्रामीण) यांनी वरिल शासकिय जमीनीचा "आगाऊ ताबा" व्यवस्थापकीय संचालक, नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि., नागपूर यांना द्यावा व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

14) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, 1966 व त्या अंतर्गत नियमातील संबंधित तरतूदी तसेच वेळोवेळी शासनाने पारित केलेले आदेश व्यवस्थापकीय संचालक, नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमी. ला बंधनकारक राहील.

(मुळ प्रत मा. जिल्हाधिकारी व्दारा स्वाक्षरी)

स्वा/-
(सचिन कुर्वे)
जिल्हाधिकारी, नागपूर

प्रत :- 1) मा. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीकरिता सादर.

2) मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीकरिता सादर.

3) मा. आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीकरिता सविनय सादर.

4) व्यवस्थापकीय संचालक, नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि., नागपूर यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस.

5) उपविभागीय अधिकारी, नागपूर (शहर)/उपविभागीय अधिकारी, नागपूर (ग्रामीण) यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस अग्रेषित. आपण सदरहू जमिनीचा आगाऊ ताबा संबंधित विभागास देवून ताबा पावती या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

6) तहसिलदार, नागपूर (शहर)/तहसिलदार, हिंगणा यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस.

जिल्हाधिकारी, नागपूर
करिता

# Possession Receipt

I, Subhash Natthuji Chaudhari, Sub Divisional Officer, Nagpur (City) delivered the possession of land Mouza Sitabuildi Tahasil Nagpur (City) bearing survey no.302 city survey No.1848 admeasuring 2535.77 sq.mts.and Mouza Dhantoli Tahasil Nagpur (City) Survey no.98,99,100 & 101,City survey no.9 admeasuring 19889.90 sq.mtrs to General Manager (Land), Nagpur Metro Rail Corporation Ltd. Nagpur vide Collector Nagpur's order No.Rev/CR-45/B-1/w.s-508/2015, dated 4th August 2015.

Nagpur
Dated-4th August 2015

Sub Divisional Officer
Nagpur(City)

Sub Divisional Officer,
Nagpur (City)

------------

I, D.G.Philip, General Manager(land), Nagpur Metro Rail Corporation Nagpur have taken over the possession of land Mouza Sitabuildi Tahasil Nagpur city bearing survey no.302 City survey No.1848 admeasuring 2535.77 sq.mts.and Mouza Dhantoli Tahasil Nagpur City Survey no.98,99,100 & 101, City survey no.9 admeasuring 19889.90 sq.mtrs from Sub Divisional Officer,Nagpur(City). vide Collector,Nagpur's order No.Rev/CR-45/B-1/w.s-508/2015 dated 4th August 2015.

D.G. PHILIP.

Nagpur
Dated-4th August 2015

General Manager,(land)
Nagpur Metro Rail Corporation Ltd
Nagpur